COLLEGE, G.M.D. ARTS, B.W.COM. & SCIENCE, Sinnar 422103

मराठा विद्या प्रसारक समज नाशिक

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर

संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभाग

नेव्ही डे अहवाल

दि.०४/१२/२०२१

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि संरक्षण शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ४ डिसेंबर नेव्ही डे आयोजित करण्यात आला. यानिमित्ताने व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पी व्ही रसाळ, उपप्राचार्य आर व्ही पवार, प्रमुख मार्गदर्शक प्रा.दिपक खुर्चे,प्रा.सी ई गुरुळे, आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा आर व्ही पवार यांनी पाहुण्याची ओळख व प्रास्ताविक केले. प्रमुख मार्गदर्शक प्रा दीपक खुर्चे यांनी आपल्या मनोगत म्हटले कि, प्रत्येक देशात लष्कराला वेगळे महत्व असतेच पण सागरी किनारा असणाऱ्या देशामध्ये नौदलाचेही तितकेच महत्व असते.आज ४ डिसेंबर भारतीय नौदल दिन आहे. देशात पूर्ण हप्ता नौदलात साजरा केला जातो. यास काही पार्श्वभूमी आहे ते म्हणजे १९७१ मध्ये झालेले भारत-पाकिस्तान युद्ध होय. तत्कालीन पूर्व पाकिस्तान मधून भारतीय हद्दीमध्ये पाकिस्तान हवाई दलाने घूसखोरी केली. भारताने अनेक चेतावणी देऊनही त्यात फारसा फरक पडला नव्हता. खरे तर १९७१ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारास भारत-पाकिस्तान यांच्यात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती.यादरम्यान केद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठीकीमध्ये पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना लष्कर प्रमुख सॅम माणेकशॉ यांनी युद्ध न करण्याची सूचना केली आणि योग्य वेळ आल्यास युद्ध कार्यवाही करण्याची भूमिका घेतली. अखेर पाकिस्तान ३ डिसेंबर १९७१ रोजी पुन्हा चूक केली आणि भारतीय पूर्व व पश्चिम लष्करी विभागांवर जोरदार हल्ला केला. त्याचवेळेस भारताच्या आयएनएस विक्रांत वर हल्ला करण्याची योजना बनवली. मात्र तेच लक्षात घेऊन भारतीय नौदलाने चुकीचा संदेश पाठवून पीएनएस गाझीची दिशाभूल केली आणि डाव साधून पीएनएस गाझी पाणबुडी उध्वस्त केली. बंगालच्या उपसागरात आयएनएस विक्रांतने दबदबा निर्माण केला आणि पाकिस्तान युद्धनौका,पाणबुड्या हल्ला चढवला.

भारतीय नौसेनेने ३ व ४ डिसेंबर १९७१ च्या मध्यरात्री भारतीय नौदलाने ऑप्रेशन त्रिशूल सुरु केले. या हल्लामुळे पाकिस्तानचा दारून परभव झाला. आणि पाकिस्तानी सैनिकांनी शरणागती पत्करली. म्हणून ४ डिसेंबर हा नौसेना दिन म्हणून साजरा केला जातो.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रा.अभिन पोटे, प्रा.सी ई गुरुळे व विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डी बी वेलजाळी यांनी केले व आभार प्रा.आर डी आगवणे मानले

प्रा.आर व्ही पवार
विभाग प्रमुख

डॉ पी व्ही रसाळ
प्राचार्य
प्राचार्य
जी.एम.डी. आर्टस, बी.डब्ल्यु कॉमर्स
ॲन्ड सायन्स कॉलेज, सिन्नर, जि.नाशिक

Scanned by CamScanner